**Newspaper: Maharashtra Times**
**Date:26th August 2025**
**News article covers 'ACTUARA' an event organised on 21st August 2025 on the occasion of National Actuaries Day at R.A.Podar College**

# 'वाणिज्य'साठी नव्या संधींचा शोध


गायत्री देव,
आर. ए. पोदार महाविद्यालय


■ पोदार महाविद्यालयात 'ॲक्चुरा' कार्यक्रम

■ ५००हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग



माटुंग्याच्या आर. ए. पोदार वाणिज्य आणि अर्थशास्त्र स्वायत्त महाविद्यालयाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी नेहमीच विविध उपक्रम आयोजित केले आहेत. याच परंपरेत, राष्ट्रीय ॲक्चुरिज दिनाच्या निमित्ताने 'ॲक्चुरा' या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमाला ५००पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आणि वाणिज्य शाखेतील 'ॲक्चुरियल सायन्स' या विषयातील नवनवीन संधींबाबत माहिती मिळवली. विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी धर्मिल मेहता उपस्थित होते.

'ॲक्चुरियल स्टडीज' हे क्षेत्र विद्यार्थ्यांसाठी नवे असल्यामुळे, या क्षेत्रात विद्यार्थ्यांची रुची वाढावी आणि करिअरच्या संधींबद्दल माहिती मिळावी, यासाठी ॲक्चुरिज दिनाचे निमित्त साधून प्राचार्या डॉ. विनिता पिंपळे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयं-वित्तपुरवठा अभ्यासक्रम कार्यक्रमाच्या समन्वयक दिव्या लालवानी यांनी 'ॲक्चुरा' हा कार्यक्रम आयोजित केला. या कार्यक्रमात धर्मिल मेहता यांनी विद्यार्थ्यांना परीक्षांची तयारी, वेळेचे व्यवस्थापन, नोकरीचे स्वरूप, जबाबदारी याबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांना ॲक्चुरियल अनॅलिस्ट, प्रायसिंग ॲक्चुअरी, अंडररायटिंग ॲक्चुअरी, री-इन्शुरन्स अनॅलिस्ट, ॲक्चुरियल मॉडेलिंग अनॅलिस्ट, डेटा सायंटिस्ट अशा विविध क्षेत्रांतील करिअरबाबतही माहिती देण्यात आली. पोदार महाविद्यालयातून हा अभ्यासक्रम केलेल्या विद्यार्थ्यांना इन्स्टिट्यूट ऑफ ॲक्चुरीज इंडियाच्या सात परीक्षा द्याव्या लागणार नाहीत, असेही त्यांनी सांगितले.

'ॲक्चुरियल सायन्स' या विषयाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जागृती निर्माण व्हावी, हा या कार्यक्रमाचा हेतू होता. हे क्षेत्र केवळ आकडेवारी इतपत मर्यादित नसून सामान्य माणसाला आर्थिकदृष्ट्या सक्षम आणि सुरक्षित ठेवणारे क्षेत्र आहे. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, याचे समाधान आहे, असे प्राचार्या डॉ. विनिता पिंपळे म्हणाल्या.

या कार्यक्रमात प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली आणि ५० विजेत्यांना प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. त्याचबरोबर तीन पेपर उत्तम गुणांनी उत्तीर्ण केलेल्या नऊ विद्यार्थ्यांसह सहभागी विद्यार्थ्यांनी संवाद साधला.